# ‘कृषिक’ ॲपमधील ‘खत गणकयंत्राच्या’ वापराविषयी मार्गदर्शिका

**कृषि विज्ञान केंद्र, बारामती व महाराष्ट्र शासन कृषि विभाग यांचे संयुक्त विद्यमाने विकसित रासायनिक खताच्या शिफारस केलेल्या मात्रा मिळवण्यासाठी कृषिक/Krushik या मोबाईल ॲप मधील गणकयंत्राचा वापर करणेसाठी शेतकरी बंधूना आवाहन –**

**शेतकरी बंधूनो,**

रासायनिक खतांचा कमीत-कमी व संतुलित वापर होण्याच्या दृष्टीने तसेच उत्पादन खर्च कमी करुन अधिक उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने प्रत्येक पिकांसाठी अचूक व फायदेशीर खत मात्रा निवडणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन जमिनीची सुपिकता वाढीस लागून अधिक उत्पन्न आपल्या हाती येईल.

ही अचूक खत मात्रा मिळविण्यासाठी फार क्लिस्ट गणिती सुत्रांचा वापर करावा लागतो. यासाठी शेतकरी मित्रांना या खत मात्रा अगदी सहज सुलभ पध्दतीने कशा मिळविता येतील हे लक्षात घेऊन कृषिक-खत गणकयंत्र विकसीत करण्यात आलेले आहे.

**'कृषिक' ॲप – खत गणकयंत्रामधील वैशिष्टये :**

- संबंधित कृषि विद्यापीठाच्या पिकनिहाय खत शिफारशींचा समावेश.
- जमिन आरोग्य पत्रिका आधारीत विविध पिकांसाठी शिफारस केलेली खतमात्रा.
- बाजारातील किंमतीनुसार प्रति एकर आवश्यक खतमात्रांच्या खर्चाची गणना.
- पिकांसाठी शिफारस केलेल्या खतमात्रेचे नत्र, स्फुरद व पालाश वापरासाठी विविध खतांचे पर्याय.
- शिफारस केलेल्या खतांच्या विभाजीत (स्प्लीट) मात्रांची गणना.
- सरळ व संयुक्त खतांच्या शिफारशींचे पर्याय उपलब्ध.
- गावनिहाय जमिन सुपिकता निर्देशांकानुसार खतमात्रांची परिगणना.

**'कृषिक' ॲप – गणकयंत्राचा वापर कसा करावा.**

शेतकरी बंधूनो, आपल्या अँड्रॉईड मोबाईल फोन मधील गूगल प्ले-स्टोअर मध्ये 'Krushik/कृषिक' सर्च करुन अथवा खालील QR कोड स्कॅन करुन प्रथम 'कृषिक' ॲप डाऊनलोड करा.

**सदर ॲप इंस्टॉल होण्यासाठी पुढील प्रक्रिया पार पाडा –**

ॲप ओपन करुन त्यात प्रथम आपला मोबाईल नंबर टाका. नंतर त्यात आपला जिल्हा, तालुका, गाव व आपले नाव ही प्राथमिक माहिती भरा. पुढे जाऊन या ॲप मधील सर्व नियम व अटी मान्य करा.

त्यानंतर आपणांस एस.एम.एस. द्वारे चार अंकी ओटीपी येईल तो टाकून पुढे जा. आता स्क्रीन वर येणाऱ्या सर्व विंडोजच्या अलाऊ (Allow) बटनावर क्लिक करा. आता आपले कृषिक ॲप इंस्टॉल होऊन वापरणेसाठी तयार झाले आहे असे समजावे.

आपणांस संबंधित कृषि विद्यापीठाच्या पिकनिहाय शिफारशीत खतमात्रा, विविध संयोजन (पर्याय), खताच्या चालू किंमतीनुसार प्रति एकरी खर्च समजण्याकरीता ॲपवरील ' कृषि गणकयंत्र' हा आयकॉन (New) क्लिक करावा.

त्यानंतर त्यातील पहिले दोन आयकॉन म्हणजे 'NPK गणकयंत्र' व 'खत मात्रा शिफारस' हे आपल्या संबंधित आहेत.

**अ) 'NPK गणकयंत्र -**

त्यातील प्रथम आपण NPK गणकयंत्र पाहू – NPK गणकयंत्रावर क्लिक करा. पुढे येणाऱ्या विंडोमध्ये आपला जिल्हा निवडा - आपल्याला पाहिजे असलेल्या पिकासाठी कृषि विद्यापीठाची शिफारशीत खतमात्रा माहीत असल्यास ती भरा. नंतर 'मोजा' हे बटन क्लिक करा- तुम्हाला विविध ११ प्रकारचे प्रति एकर खत वापराचे पर्याय (संयोजने) दिसतील व त्यापुढे त्या खतांसाठी चालु बाजार भावानुसार प्रति एकर खर्च दिसेल. यातून आपणांस निश्चित केलेल्या पिकासाठी एक चांगला व कमी खर्चाचा पर्याय निवडावा लागेल.

जर आपणास कृषि विद्यापीठाची शिफारशीत खतमात्रा माहीत नसेल तर 'नाही' हा पर्याय क्लिक करा – पुढे जाऊन 'पीक निवडा' या बटनावर क्लिक करा- नंतर पिक निवड करा- त्यानंतर लगेच त्यावर त्या पिकासाठी संबंधित कृषि विद्यापीठाची खत मात्रा भरलेली दिसेल. – नंतर पुढे जावून 'मोजा' या बटनावर क्लिक करा- लगेच वरील प्रमाणे आपणास परत विविध ११ प्रकारचे खत वापराचे पर्याय दिसतील - त्यातील चांगला व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय तुम्ही निवडायचा आहे.

**ब) खतमात्रा शिफारस -**

**आता आपण 'खतमात्रा शिफारस' हा आयकॉन पाहू-**

'खतमात्रा शिफारस' यावर क्लिक करा- त्यानंतर आपला जिल्हा निवडा व पुढे जा - आता पुढे खत देण्याचा पर्याय निवडा 'जमिनीतुन साध्या पध्दतीने' किंवा 'ठिबकद्वारे'- त्यासाठी आपण प्रथम 'साध्या पध्दतीने' हा पर्याय निवडू- नंतर पिकाचा प्रकार निवडा- जसे तृणधान्ये/कडधान्ये/गळीतधान्ये/भाजीपाला पिके/फळपिके/नगदी पिके व इतर पिके – पुढे जाऊन त्यातील आवश्यक पिक निवडा – पुढे जाऊन माती परिक्षण झाले आहे वा असल्यास व आपणांकडे त्या क्षेत्राची जमिन आरोग्य पत्रिका असेल तर होय म्हणा

- होय निवडल्यास – त्यातील १२ घटकांची माहिती भरा – पुढे जाऊन आपणाकडे उपलब्ध असलेल्या खताचा प्रकार निवडा – जसे की, नत्रयुक्त खते (युरीया, अमो. सल्फेट), पालाशयुक्त खते (म्युरेट ऑफ पोटॅश, सल्फेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते (सिंगल सुपर फॉस्फेट, डिएपी, 24:24:0, 10:26:16) - नंतर मोजा बटणावर क्लिक करा - लगेच आपणासमोर १६ घटाकांचे कमी- मध्यम- जास्त असे प्रमाण दिसेल तसेच त्याखाली संबंधित कृषि विद्यापीठाच्या प्रति एकरी खत मात्रा व त्यांचा खर्च किती येईल तो दिसेल. यामध्ये नत्र, स्फुरद, पालाश, शेणखत, कंपोस्ट खत, जैविक खते व सुक्ष्म मूलद्रव्ये पिकनिहाय खताचे डोस, पेरणीवेळी व पेरणीनंतर अशीही विभागणी (स्प्लीट) दिसेल.

आता खते देण्याचा 'ठिबकद्वारे' हा पर्याय निवडू - नंतर पुढे जाऊन पिक निवडा - माती परिक्षण झाले की नाही म्हणा व पुढे जा- आपणास वरीलप्रमाणे १६ घटकांचे कमी-मध्यम-जास्त असे प्रमाण दिसेल – त्यानंतर त्याखाली संबंधित कृषि विद्यापीठाच्या प्रति एकरी खत मात्रा व त्यांचा खर्च किती येईल तो दिसेल- तसेच खते देण्याची वेळ पहिल्या कॉलममध्ये दर्शविलेली असेल.

माती परिक्षण झाले आहे का ? 'होय' म्हणल्यास त्यात आपल्या त्या क्षेत्रासाठी प्राप्त झालेल्या जमिन आरोग्य पत्रिकेमधील १२ घटकांची माहीती भरा नंतर उपलब्ध खतांचा प्रकार निवडा व मोजा पर्याय निवडुन पुढे जा - आपणास ठिबकद्वारे द्यावयाच्या खतमात्रा व त्यासाठीचा खर्च दिसेल.

टिप - ॲप विकसनाच्या प्रथम टप्यात फक्त महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी यांच्या कार्यक्षेत्रातील शिफारशीत पिकांसाठी 'ठिबकद्वारे' खत मात्रांचा समावेश केलाआहे. दुस-या टप्यात उर्वरीत सर्व विद्यापिठांच्या पिकांसाठी ठिबकद्वारे खतमात्रांचा समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.

शेतकरी मित्रांनो वरीलप्रमाणे आपण कृषिक गणकयंत्राच्या माध्यमातून संबंधित कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेल्या विविध पिकांसाठीच्या खतमात्रा परिगणीत करण्यासाठी या मोबाईल ॲपचा आवश्य वापर करा. त्याप्रमाणे खतांचा फायदेशीर पर्याय (संयोजन) निवडा आणि भरघोस उत्पन्न मिळवा असे जाहीर आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

**कृषिक ॲप डाऊनलोड करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा**